महा मेट्रो

PUNE METRO

## अर्थसंकल्पात केंद्रीय नगर विकास खात्या करिता रक्कम मंजूर

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड*
(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

पुणे ०१  : केंद्रीय वित्त मंत्री श्री. पियुष गोयल यांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात केंद्रीय गृह निर्माण आणि नगर विकास खात्या करिता २०१९-२० या आर्थिक वर्षा करता एकूण १७७१३.९३ कोटी एवढी रक्कम मंजूर केली आहे. देशातील सर्व मेट्रो प्रकल्पान करता आर्थिक तरतूद याच निधीतून होणार आहे. २०१८-१९ या आर्थिक वर्षा करता अर्थसंकल्पात १४८६४.६० कोटी एवढी तरतूद केली होती. त्यामुळे चालू आर्थिक वर्षा करता मिळालेल्या निधी मध्ये २०टक्के ची भरघोस वाढ या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पात २०१९-२० या कालावधी करिता पुणे मेट्रो प्रकल्पाकरता २०१९-२० या आर्थिक वर्षाकरता २०१० कोटीची मागणी केली आहे. तसेच २०१८-१९ या आर्थिक वर्षा करता १३२२ कोटीची मागणी पुणे मेट्रो रेल प्रकल्पा करता केली होती.

तसेच १८१७.०३ कोटी रुपयांची मागणी नागपूर मेट्रो प्रकल्पा करता केली आहे तसेच २०१८-१९ आर्थिक वर्षा करता १५०७ कोटीची मागणी नागपूर मेट्रो रेल प्रकल्पा करता केली होती.